ISSN 2393-8412

International Registered and Recognized
Research Journal Related to Higher Education for Social Sciences

# INDO ASIAN SOCIAL SCIENCE RESEARCH JOURNAL

( Refereed, Peer Reviewed & Indexing Research Journal)

Year -VII, Issue - XIV, Vol.- I Impact Factor 6.10 (GRIFI) Feb. 2021 To July 2021

IAP
INDO ASIAN PUBLICATION

EDITOR IN CHIEF

DR. JAIDEEP R. SOLUNKE

Scanned with CamScanner

IMPACT FACTOR 6.10

ISSN 2393- 8412

International Registered & Recognized Research Journal Related to Higher Education for Social Sciences

# INDO ASIAN SOCIAL SCIENCE RESEARCH JOURNAL

UGC APPROVED, REFEREED & PEER REVIEWED RESEARCH JOURNAL

Issue : XIV, Vol. I

Year-VII, Bi-Annual(Half Yearly)

(Feb. 2021 To July 2021)

**Editorial Office :**

'Gyandev-Parvati',
R-9/139/6-A-1,
Near Vishal School,
LIC Colony,
Pragati Nagar, Latur
Dist. Latur - 413531.
(Maharashtra), India.

**Website**

www.irasg.com

Contact : - 02382 - 241913
09423346913 / 09637935252
09503814000 / 07276301000

E-mail :
visiongroup1994@gmail.com
interlinkresearch@rediffmail.com
mbkamble2010@gmail.com

Published by :
Indo Asian Publication,
Latur, Dist. Latur - 413531 (M.S.)India

Price : ₹ 200/-

**EDITOR IN CHIEF**

Dr. Jaideep R. Solunke
Dept. of Geography,
Shri Pandit Guru Pardikar Mahavidyalaya,
Sirsala, Dist. Beed (M. S.)

**EXECUTIVE EDITORS**

Dr. Vinod Jadhav
Head Dept. of Sociology,
M. D. M. Mahavidyalaya,
Aurad (S), Dist. Latur (M. S.)

Dr. H. P. Kadam
I/C Principal,Head, Dept. Pol. Science,
Shri P. G. P. Mahavidyalaya,
Sirsala, Dist. Beed (M. S.)

**DEPUTY EDITOR**

Dr. Mahesh Mothe
Head, Dept. of Pol. Science,
S. M. P. Mahavidyalaya,
Murum, Dist. Osmanabad (M. S.)

Dr. Shankar Lekhane
Head, Dept. of P. A.,
A. C. S. Mahavidyalaya,
Shankar Nagar, Dist. Nanded (M. S.)

**CO - EDITOR**

Dr.G. V. Gatti
Head, Dept. of History
Shri P. G. P. Mahavidyalaya,
Sirsala, Dist. Beed (M. S.)

Dr. D. B. Maske
Librarian
Shri P. G. P. Mahavidyalaya,
Sirsala, Dist. Beed (M. S.)

**MEMBER OF EDITORIAL BOARD**

Dr. Jyoti A. Upadhye
Dept. of Phy. Edu & Sports Sciences,
K. S. A. Women's University,
Vijayapura, Dist. Vijayapura (K.A.)

Dr. Sunil Kumar
Dept. of Physical Education,
Dr. Babasaheb Ambedkar College,
Amravati, Dist. Amravati (M.S.)

Dr. Alok Tiwari
Dept. of Yoga Science,
Dr. R.M.L.A University,
Ayodhya, Dist. Ayodhya (U. P.)

Dr. Vaishali Deshmukh
Head, Dept. of Music,
Govt. Arts & Science College,
Aurangabad, Dist. Aurangabad (M.S.)

Dr. Sanjay Shinde
Head, Dept. of Sociology,
S. B. M. Mahavidyalaya,
Rahimatpur, Dist. Satara (M.S.)

Dr. Yadhav Ghodke
Dept. of Sociology,
P. V. P. Mahavidyalaya,
Pathoda, Dist. Beed (M. S.)

Scanned with CamScanner

| Sr. No | Title for Research Paper | Page No |
|---|---|---|
| 13 | पं. राम मराठे - सांगीतिक कारकीर्द<br>**पल्लवी मिलिंद पोटे** | 62 |
| 14 | प्रभावी व उत्तरदायी प्रशासनासाठी : नागरिकांची सनद<br>**डॉ. शंकर लेखणे** | 69 |
| 15 | यशवंतराव चव्हाणांचे परराष्ट्र धोरणातील योगदान<br>**डॉ. महेश मोटे** | 72 |
| 16 | पंचायतराज व्यवस्थेतील राजकीय नेतृत्वासाठी आवश्यक घटक एक अभ्यास<br>**डॉ. एच. पी. कदम** | 81 |
| 17 | बीड जिल्ह्यातील अल्पभूधारक शेतकऱ्यावरील शासकीय योजनेच्या अभ्यासाचे समाजशास्त्रीय महत्व<br>**डॉ. यादव घोडके** | 86 |
| 18 | जागतिकीकरणाचा भारतीय कुटूंब संस्थेवरील परिणाम<br>**डॉ. संजय हिंदूराव शिंदे** | 91 |
| 19 | गाव विकासातील महिलांची भूमिका - एक समाजशास्त्रीय अभ्यास<br>**डॉ. विनोद जाधव** | 97 |


Scanned with CamScanner

IMPACT FACTOR
6.10

ISSN 2393-8412
Indo Asian Social Science Research Journal (IASSRJ)
Issue : XIV, Vol. I
Feb. 2021 To July 2021
www.irasg.com

Research Paper 14 Public Administration

# प्रभावी व उत्तरदायी प्रशासनासाठी : नागरिकांची सनद

**डॉ. शंकर लेखणे**
लोकप्रशासन विभाग,
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
शंकर नगर,

## प्रस्तावना :

लोकप्रशासनामध्ये प्रशासन व जनता यांच्या संबंधांना आणि त्यांच्यातील आंतरक्रियांना विशेष महत्त्व असते. लोकाभिमुख व परिणामकारक प्रशासनाची ती एक पूर्वअटच आहे. प्रशासनाचे जनतेशी असलेले संबंध घट्ट असावेत, त्यांच्यात कार्यपूर्तीसाठी सुसंवाद असावा, यासाठी प्रशासकीय सुधारणेचा भाग म्हणून अनेक प्रयत्न केले जातात. असाच एक प्रयत्न ९०च्या दशकात ब्रिटनमध्ये 'नागरिकांच्या सनदेच्या' रूपात झालेला दिसून येतो.

नागरिकांच्या सनदेची सुरुवात इ. स. १९९१ मध्ये सर्वप्रथम ब्रिटनमध्ये झालेली दिसून येते. नागरिकांची सनद हा असा दस्तऐवज असतो, जो प्रशासकीय संघटनेच्या वतीने जनहितार्थ प्रसिद्ध केला जातो. यामध्ये प्रशासकीय पारदर्शकता, कार्यकुशलता, संवेदनशीलता, तसेच उत्तरदायित्वाच्या उद्देशप्राप्तीसाठी संघटनेची कार्यपद्धती, प्रक्रिया, कार्यपूर्तीचा कालावधी, त्याचबरोबर लोकांच्या किंवा ग्राहकांच्या अधिकाराबरोबरच त्यांच्या तक्रारनिवारणाची कार्यपद्धती मांडलेली असते. एकंदरित प्रशासनाला प्रभावी, पारदर्शक व लोकाभिमुख बनविण्याचा एक मार्ग म्हणून नागरिकांच्या सनदेकडे पाहिले जाते.

## नागरिकांच्या सनदेचा अर्थ :

भारत सरकारच्या केंद्रीय सचिवालय कार्यालय पद्धती नियमपुस्तिकेत नागरिकांच्या सनदेचा अर्थ पुढीलप्रमाणे स्पष्ट करण्यात आला आहे. ''नागरिकांची सनद हा एक असा दस्तऐवज आहे, ज्यात संस्थेकडून नागरिक किंवा ग्राहकांना पुरविण्यात येणाऱ्या सेवांची माहिती, निवड, औपचारिकता, तक्रारनिवारण, सेवांचा दर्जा व मूल्य यासंदर्भातील वचनबद्धतेवर लक्ष केंद्रित केलेले असते. यामध्ये नागरिक किंवा ग्राहकांसाठी संस्थेची असलेली बांधिलकी



Scanned with CamScanner

पूर्ण करण्यासाठी केलेल्या अपेक्षादेखील असतात.'' नागरिकांच्या सनदेचा भर हा नागरिक है सार्वजनिक सेवेचे उपभोक्ते, ग्राहक आहेत, यावर आहे. इंग्लंडचे पंतप्रधान जॉन मेजर यांनी नागरिकांच्या सनदेची संकल्पना उपभोक्त्यांच्या इच्छा आणि गरजांप्रती सार्वजनिक सेवा अधि ाक प्रतिसादात्मक होऊन त्यांचा दर्जा उंचवावा यासाठी मांडली होती. त्यांनी मांडलेल्या संकल्पनेत नागरिकांच्या सनदेत सहा तत्त्वे अंतर्भूत असलेली दिसून येतात. ती म्हणजे – सेवांची गुणवत्ता सुधारणे, उपभोक्त्यांना शक्य असेल तेथे निवड, वेळेच्या बंधनात कशाची अपेक्षा केली जाते ते नमूद करणे, करदात्याच्या पैशाचे मूल्य जाणणे, सेवापुरवठादार उत्तरदायित्व, नियम, कार्यपद्धती, योजना आणि तक्रारनिवारणामध्ये पारदर्शकता आणणे होय.

**नागरिकांच्या सनदेसाठी भारतातील प्रयत्न :**

भारतात ९०च्या दशकात नागरिकांच्या सनदेची मागणी जोर धरू लागली, अनेक ग्राहक संघटनांनी त्या दृष्टीने प्रयत्नही केले. १९९६ साली दिल्ली येथे राज्यांच्या मुख्य सचिवांचे संमेलन आयोजित करण्यात आले होते. त्यात 'प्रभावी व उत्तरदायी प्रशासन' यावर गांभीर्याने चर्चा व विचारविमर्श झाला. नंतर एका वर्षाने १ मे १९९७ रोजी तत्कालीन पंतप्रधान श्री. इंद्रकुमार गुजराल यांच्या अध्यक्षतेखाली 'प्रभावी व उत्तरदायी प्रशासन' या विषयावर मुख्यमंत्र्यांचे संमेलन आयोजित करण्यात आले आणि या संमेलनामध्ये 'नऊ सूत्री कार्यक्रम योजना' निर्माण करण्यात आली. ज्यात पुढील बाबी सुनिश्चित करण्यात आल्या.

१. नागरिकांसाठी अधिकार व जबाबदार प्रशासन
२. प्रभावी व तत्पर तक्रारनिवारण
३. ग्रामीण व नागरी स्थानिक संस्थांना व्यापक अधिकार
४. अंमलात आणलेल्या कायदे व प्रक्रियांचे पुनरावलोकन व सरळीकरण
५. प्रशासनातील पारदर्शकता
६. शासकीय कार्यालयातून माहिती मिळवण्याचा अधिकार
७. लोकसेवकांसाठी आचारसंहिता
८. भ्रष्टाचाराच्या संस्थेला सोडविण्यासाठी कर्मचाऱ्यांच्या कार्यकाळात स्थैर्य
९. सेवांचे विकेंद्रीकरण

या संमेलनानंतरच २००१ साली भारत सरकारच्या ६८ विभागांतून व शासकीय संघटनांकडून नागरिकांच्या सनदेची निर्मिती करण्यात आली. त्याचबरोबर राज्य सरकारने ३१८ विभागांतून, तसेच सार्वजनिक उपक्रमांकडूनही नागरिकांच्या सनदेची निर्मिती करण्याचे प्रयत्न सुरू झाले व नागरिकांना केंद्रीभूत मानून गुणवत्तापूर्ण सेवा, वक्तशीरपणा, जबाबदार व उत्तरदायी प्रशासकीय कार्यपद्धती निर्मिण्यावर भर देण्यात आला.

**भारतातील नागरिकांच्या सनदेची आधारभूत तत्त्वे :**

भारतातील नागरिकांची सनद ही खालील तत्त्वांवर आधारलेली दिसून येते.

१. सार्वजनिक संस्थांच्या कार्यनिष्पत्तीच्या प्रमाणकांना व्यापक प्रसिद्धी देणे
२. सेवांच्या गुणवत्तेबाबत खात्री देणे



Scanned with CamScanner

३. सौजन्य व मदत किंवा सहकार्य या प्रवश्त्तीने माहितीची सहज उपलब्धता करून देणे
४. नागरिकांची निवड व त्यांच्याशी सल्लामसलत करणे
५. तक्रारी नोंदविण्यासाठी व त्यांच्या निवारणासाठी सुलभ पद्धती निर्माण करणे
६. नागरिकांच्या सहभागाने कार्यनिष्पत्तीच्या चौकशीची तरतूद करणे

**नागरिकांच्या सनदेचे महत्त्व :**

प्रशासनाला जनतेप्रती उत्तरदायी बनविणे, प्रशासनाकडून देण्यात येणाऱ्या सेवांचा दर्जा उंचावणे आणि नागरिकांना व्यापक अधिकार देणे, यासाठी नागरिकांची सनद महत्त्वपूर्ण ठरत आहे. नागरिकांच्या सनदेमुळे प्रत्येक नागरिकास कोणत्याही कार्यालयातील कार्यपद्धती, तसेच कार्यासाठीची कालबद्धता यांची माहिती मिळत असल्यामुळे प्रशासनातील दप्तरदिरंगाईवर जनतेचा अंकुश निर्माण झाला आहे. निश्चित कालावधीत जर कार्य पूर्ण झाले नसेल, तर कोणत्या अधिकाऱ्याकडे तक्रार करावी, याचीही जनतेला माहिती होत आहे. उदा. एखाद्या विद्यार्थ्यांची गुणपत्रिका हरविली असेल, तर विद्यापीठातून दुसरे गुणपत्रक कसे मिळवावे, त्याची कार्यपद्धती, शुल्क व त्यासाठी लागणारा कालावधी यांची स्पष्ट माहिती परीक्षा विभागात नागरिकांच्या सनदेमध्ये दिलेली असते.

**सारांश :**

नागरिकांच्या सनदेची उपयुक्तता व तिचे महत्त्व अनन्यसाधारण स्वरूपाचे आहे. परंतु प्रशासनाकडून याचा प्रभावीपणे अवलंब केला जावा, यासाठी नागरिकांमध्ये जागश्ती आणणेही गरजेचे आहे. अनेक लोकांना आपल्या अधिकारांची जाणीवही नसते. त्यामुळे या ठिकाणी नागरी समाजाचे हे कर्तव्य ठरते की, त्यांनी जनतेमध्ये नागरिकांच्या सनदेविषयी वर्तमानपत्रातून, तसेच सोशल मीडियाच्या माध्यमातून व्यापक प्रचार व प्रसार केला पाहिजे. त्याचबरोबर प्रशासनातील अधिकाऱ्यांनाही आपले कर्तव्य नैतिकतेने व जननिष्ठेने पार पाडले पाहिजे. प्रशासनाला नैतिक अधिष्ठाण असेल, तर प्रशासन निश्चितच प्रभावी, दर्जेदार व उत्तरदायी बनते.

## संदर्भ सूची :-

१. डॉ. सुरेंद्र कटारिया, सौरभ कटारिया, 'लोकप्रशासन पारिभाषिक कोश', नेशनल पब्लिशिंग हाऊस, जयपूर एवं दिल्ली.
२. अशोक कुमार दुबे, '२१ वी शताब्दी में लोकप्रशासन', मॅग्राहिल प्रकाशन, नई दिल्ली
३. भिंगे सुभाष गौरवग्रंभ, 'लोक प्रशासनातील नवे विचारप्रवाह', ओम साई प्रकाशन, नायगाव, २०११
४. मोहित भट्टाचार्य, अनु. वासंती फडके, 'न्यू होरायझंस ऑफ पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशन', के. सागर पब्लिकेशन, पुणे, २०११
५. संकेत स्थळ विकिपिडिया



Scanned with CamScanner